# महाराष्ट्रातील खरी रोजगारस्थिती : बेरोजगारीच्या आकडेवारीपलीकडे



हितेश पोतदार

अर्थबोध



*प्रातिनिधिक छायाचित्र*


**बे**रोजगारी आणि रोजगाराच्या मुद्द्यावर बोलताना आपण अनेकदा केवळ बेरोजगारीच्या दराकडे पाहतो. हा दर वर–खाली होतो, कधी चर्चेत येतो, कधी नाहीसा होतो, आणि बहुतांश वेळी त्याचा वापर राजकीय संवादात प्रचारासाठी किंवा विरोधासाठी केला जातो. पण बेरोजगारीचा दर म्हणजे रोजगारस्थितीचं संपूर्ण चित्र आहे का? महाराष्ट्रासारख्या राज्यात, जिथे भांडवलशाही औद्योगिकीकरण, स्थलांतर, आणि असंघटित श्रमिकवर्गाच्या कष्टांवर अवलंबून आहे, तिथे केवळ बेरोजगारीच्या आकडेवारीकडे पाहणं अपुरं ठरतं…

२०१९च्या लोकसभा निवडणुकांमध्ये आणि कोविड-१९ च्या काळात बेरोजगारीचा प्रश्न चर्चेच्या केंद्रस्थानी आला. त्या वेळी, अनेक वर्षांनंतर देशात बेरोजगारीवर गंभीर चर्चा झाली. कारण पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर मध्यमवर्गीय आणि उच्चशिक्षित तरुणही बेरोजगार राहिले. त्यानंतर, कोविड काळात लॉकडाऊनमुळे श्रमिक वर्गाला प्रचंड विस्थापनाचा सामना करावा लागला. या दोन्ही टप्प्यांमध्ये बेरोजगारीची आकडेवारी चर्चेत आली, कारण अचानक मोठ्या प्रमाणावर लोकांकडे कोणताही रोजगार नव्हता, आणि त्याचा परिणाम थेट आर्थिक व्यवस्थेवर जाणवत होता.


पण ही चर्चा दीर्घकाळ टिकली नाही. कोविडनंतरची तीन वर्षे पाहिल्यास, बेरोजगारीचा दर सतत घटत असल्याचं 'नियतकालिक श्रम शक्ती सर्वेक्षण' (Periodic Labour Force Survey, PLFS) २०१७ ते २०२३पर्यंतच्या आकडेवारीत स्पष्ट दिसतं. मुख्य प्रवाहातील अर्थशास्त्र आणि सरकारी नोंदी यामुळे हा आकडा एक सकारात्मक बदल म्हणून सादर केला जातो. मात्र, केवळ बेरोजगारीचा दर कमी झाल्याने रोजगाराच्या स्थितीमध्ये सुधारणा झाली असं मानणं चूक ठरतं. प्रत्यक्षात, कोणत्या प्रकारच्या रोजगारात वाढ झाली आहे, कोणत्या गटांना कोणत्या क्षेत्रात सामावून घेतलं जात आहे, आणि त्या नोकऱ्यांची स्थिरता आणि सुरक्षितता काय आहे, हे तपासल्याशिवाय बेरोजगारीच्या दराचा अर्थ लावता येणार नाही.

**बेरोजगारीचा दर घटला, पण कुठल्या प्रतीचा रोजगार वाढला?**

पीएलएफएस २०१७-२३ डेटा पाहिल्यास, महाराष्ट्रातील बेरोजगारी दरात सातत्याने घट होत असल्याचे दिसते. २०१८ मध्ये हा दर ९.५ टक्के होता, तो २०२३ पर्यंत ५.४ टक्के वर आला आहे (चालू सप्ताह स्थिती/Current Weekly अनुसूचित जमाती status अनुसार). बेरोजगारीच्या संख्येत ही घसरण केवळ शहरी भागातच नाही, तर ग्रामीण भागातही दिसते. याचा सरळ अर्थ असा लावला जातो, की लोकांना जास्त प्रमाणात रोजगार मिळत आहे. परंतु, याच वेळी काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात-ही रोजगारनिर्मिती कोणत्या क्षेत्रांत होत आहे? कामगार कोणत्या प्रकारच्या नोकऱ्यांमध्ये सामील होत आहेत? त्यांची उपजीविका कोणत्या स्वरूपाची आहे?





एका बाजूला महाराष्ट्रातील कामगारवर्गाचे प्रमाण (Worker Population Ratio - WPR) २०१७ मधील ५२ टक्के वरून २०२३ मध्ये ५९.३टक्के पर्यंत वाढले आहे, म्हणजेच अधिक लोक काम करत आहेत. त्याचवेळी, कामाच्या शोधात असणाऱ्या लोकांचे प्रमाण (Labour Force Participation Rate - LFPR) २०१७ मध्ये ५६.५ टक्के होते, ते २०२३पर्यंत ६२.६ टक्के पर्यंत वाढले आहे. ही वाढ पाहता रोजगाराच्या नव्या संधी निर्माण झाल्याचा दावा केला जातो. परंतु, जेव्हा आपण हे आकडे फोडून पाहतो, तेव्हा अधिक खोलवर प्रश्न निर्माण होतात.




**कष्टकरी जाती-जमातींच्या रोजगाराचे स्वरूप बदलतेय का?**

महाराष्ट्रातील सामाजिक प्रवर्गनिहाय रोजगार सहभागाचा विचार केल्यास, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आणि ओबीसी समुदायांमध्ये बेरोजगारीचा दर घटताना दिसतो. २०१८ मध्ये अनुसूचित जातींसाठी बेरोजगारी दर १२टक्के होता, तो २०२३ पर्यंत ८.१टक्के झाला आहे. अनुसूचित जमातींसाठी तो २०१९ साली ९.८ वरून तो थेट ४.३ टक्क्यांपर्यंत घसरलेला दिसतो. बेरोजगारीचा आकडा घटत असला तरी, तो कोणत्या प्रकारच्या रोजगारामुळे घटला आहे, हे महत्त्वाचे आहे.





पीएलएफएस डेटानुसार, अनुसूचित जाती-जमातींचे मोठे प्रमाण बांधकाम, खाणकाम, आणि असंघटित क्षेत्रात सरकत आहे. म्हणजेच, ज्या क्षेत्रांत वेतन अस्थिर असते, कामगारांना कोणतीही सामाजिक सुरक्षा मिळत नाही, अशा ठिकाणी त्यांची संख्या वाढत आहे. ग्रामीण भागात शेतीमधून बाहेर पडणाऱ्या मजुरांना औद्योगिक किंवा उच्च-उत्पन्नाच्या क्षेत्रांमध्ये सामावून घेतले जात नाही; त्याऐवजी, ते कंत्राटी, अप्रमाणिक (informal), आणि कधी कधी छुप्या (shadow) क्षेत्रांत सामील होत आहेत.

**महाराष्ट्रातील रोजगाराचे बदलते चित्र: सामाजिक गट आणि लिंगभेदाच्या दृष्टीने**

२०१७ ते २०२३ या कालावधीतील पीएलएफएस डेटाच्या आधारे महाराष्ट्रातील रोजगार परिस्थितीचे विश्लेषण केल्यास, बेरोजगारी दरातील घट दिसते. हा दर कमी होणे हे मोठ्या प्रमाणावर अस्थिर, अनौपचारिक, आणि कमी पगाराच्या कामांमध्ये स्थलांतरित झालेल्या कामगारांचे निदर्शक असू शकते. २०१७ नंतर विशेषतः कोविडच्या आधी आणि नंतर, बेरोजगारी दर घटलेला दिसतो. २०२३ पर्यंत महाराष्ट्रात बेरोजगारी दर फक्त ५.४ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. २०२३ मध्ये अनुसूचित जमाती (अनुसूचित जमाती) मध्ये बेरोजगारी दर ४.२ टक्के असून तो सर्वात कमी आहे, तर अनुसूचित जाती (अनुसूचित जाती) मध्ये हा दर ८.२ टक्के एवढा उंचावला आहे. मात्र, अनुसूचित जमाती समुदायातील ही सुधारणा केवळ संख्यात्मक नाही. कारण, त्यांच्या ५०-५३ टक्के रोजगार हे कृषिक्षेत्रात अडकले आहेत, जे अत्यंत अनिश्चित आणि निम्न-उत्पन्न देणारे आहे. त्याउलट, अनुसूचित जाती समुदायातील ३२-३७ टक्के रोजगार कृषीतून बांधकाम (१८-२०टक्के) आणि उत्पादनक्षेत्राकडे सरकला आहे, पण ही विविधता अस्थिर रोजगाराच्या खाईत ढकलणारी आहे.

**औपचारिक वि. अनौपचारिक रोजगार: अनुसूचित जाती व जमाती, महिला आणि मुस्लीम समाज**

महिला, अनुसूचित जाती-अनुसूचित जमाती समुदाय, आणि मुस्लिम समाजात अनौपचारिक रोजगाराचे प्रमाण जास्त असल्याचे डेटा सांगतो. महिलांमध्ये ६१.४ टक्के रोजगार कृषीत आहे, तर ९.२४ टक्के उत्पादनक्षेत्रात. पुरुषांच्या तुलनेत महिलांचे नियमित पगारी (Regular Salaried) रोजगारात प्रवेश अत्यंत कमी (०.७९ टक्के पुरुष वि. -५८.४७ टक्के महिला) आहे. तथापि, शिक्षण क्षेत्रात महिलांचा सहभाग दुपटीने वाढलेला दिसतो, परंतु विज्ञान आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील सहभागात मोठी घट झाली आहे. हे मुख्यतः आर्थिक उदारीकरणानंतर सेवा क्षेत्रात वाढलेल्या निम्न-स्तराच्या नोकऱ्यांशी संबंधित आहे. ही फारकत केवळ लिंगभेदात्मक नसून, समाजाच्या संरचनात्मक असमतेची निदर्शक आहे.




अनुसूचित जाती व जमाती समुदायांच्या बाबतीत औपचारिक रोजगाराचे प्रमाण अत्यंत कमी (अनुसूचित जमाती: ११-१६टक्के, अनुसूचित जाती: ८-११टक्के) आहे. २०१७-२०२१ दरम्यान अनुसूचित जमातीमध्ये औपचारिक रोजगारात घट झाली, तर २०२२-२३ मध्ये थोडी वाढ दिसते. अनुसूचित जातीमध्ये हे प्रमाण अस्थिर असले तरी २०२३ पर्यंत माफक सुधारणा आहे. मात्र, दोन्ही गटांमध्ये ८५-९० टक्के रोजगार अनौपचारिकच आहे. ही अनौपचारिकता केवळ कमी पगारात नाही तर सामाजिक सुरक्षा, आरोग्य, आणि निवृत्तीवेतनाच्या अभावातही प्रकट होते.

अनुसूचित जातींसाठी रोजगाराची स्थिरता आणखी कठीण होत चालली आहे. २०१७ मध्ये ५.०५ टक्के अनुसूचित जाती कामगार कॉर्पोरेट व्यवस्थापनाच्या नोकऱ्यांमध्ये होते, परंतु


२०२३ मध्ये हा आकडा ०.३२ टक्के इतका घसरला आहे. त्याउलट, बांधकाम आणि खाणकामातील कष्टकरी मजुरांमध्ये त्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. २०१७ मध्ये हा आकडा ७.५१टक्के होता, तर २०२३ मध्ये तो १३.२८ टक्के झाला आहे. अनुसूचित जाती समुदायात 'घरगुती नोकर' म्हणून नोंदवलेल्या रोजगारात २०१७ ते २०२३ दरम्यान दुप्पटीहून अधिक वाढ झाली आहे, जे घरगुती कामगारांच्या वाढत्या शोषणाचे संकेत देते. विशेष म्हणजे, २०२१ नंतर 'रिफ्युज वर्कर्स' (घनकचरा व्यवस्थापन, सफाई कामगार) यांसारख्या कामांमध्ये या समुदायांचा मोठा प्रवेश दिसून येतो. (ज्याची २०२१ पूर्वीची नोंद आढळत नाही, त्या विषयाला उपरोक्त लेखात हात घातलेला नाही) हे बदल शक्यतः कृषी संकटामुळे होत असतील, ज्यामुळे लोक अधिक धोकादायक क्षेत्रांकडे ढकलले जात आहेत.

अनुसूचित जाती (अनुसूचित जाती)मध्ये रोजगार दर उंचावला आहे, परंतु परिस्थिती काहीशी वेगळी नाही. कृषी हा अनुसूचित जमाती समुदायासाठी अजूनही मुख्य क्षेत्र आहे (५०-५३टक्के रोजगार शेतीशी संबंधित आहे), त्यापाठोपाठ बांधकाम क्षेत्रात त्यांचा सहभाग ९-११टक्के इतका आहे. विशेष म्हणजे, २०२१ नंतर या समुदायांतील काही भाग खाणकाम आणि घरगुती मजुरीसारख्या अस्थिर व्यवसायांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतलेला दिसतो. हे स्थलांतर अनेकदा उपजीविकेच्या इतर कोणत्याही पर्यायांच्या अभावामुळे होते. अनुसूचित जमाती समुदायात 'कचरा व्यवस्थापन' (सॅनिटेशन वर्कर्स) आणि खाणकामात अचानक वाढ झाली आहे, ज्याची नोंद पूर्वी नव्हती.

मुस्लिम समुदायातील रोजगाराचे स्वरूपही बदलत आहे. २०१७ ते २०२३ दरम्यान बांधकामक्षेत्रातील रोजगार ९.७४ वरून १६.१२ टक्केपर्यंत वाढला आहे. मात्र, कॉर्पोरेट व्यवस्थापकांचे प्रमाण १३.२८ टक्क्यांवरून २.९८ टक्क्यांपर्यंत घटले आहे. याच्या समांतर, माहिती तंत्रज्ञान (ICT) आणि विज्ञान क्षेत्रात माफक वाढ दिसते, पण तीही अनौपचारिक रोजगाराच्या पार्श्वभूमीवर क्षुल्लक आहे.

**स्वयंरोजगार: आर्थिक संधी की हतबलता?**

स्वयंरोजगार हा शब्द प्रचलित असला तरी, त्यामागील कठोर वास्तव डेटामध्ये दिसत नाही. 'डेक्कन हेराल्ड'च्या मते, भारतातील ८० टक्के स्वयंरोजगारीतून मिळणारे उत्पन्न दर दिवसाच्या दराने २०० रुपयांपेक्षा कमी आहे. पीएलएफएस मध्ये स्वयंरोजगारीत गणलेले अनेक लोक प्रत्यक्षात बेरोजगारच आहेत, पण जगण्यासाठी काहीतरी करत आहेत. उदाहरणार्थ, महिलांमध्ये स्वयंरोजगाराचे प्रमाण वाढले असले तरी, त्यातील बहुसंख्य घरगुती कामांत (उदा., पशुपालन, हस्तकला) गुंतलेल्या आहेत, ज्यांना बाजारात मोबदला मिळत नाही.




अनुसूचित जाती (schedule caste), अनुसूचित जमाती (schedule tribes), मुस्लिम समाज आणि महिलांमध्ये स्वयंरोजगाराचा वाटा वाढला आहे, पण तो निवडीचा परिणाम नसून आर्थिक विवंचनेतून उद्भवलेली मजबुरी आहे. आर्थिक असुरक्षिततेत भर पडल्याने अनेकांना सामान्य वेतनाच्या, अनौपचारिक व अस्थिर स्वरूपाच्या कामांमध्ये ढकलले गेले आहे. मुख्य प्रवाहातील अर्थशास्त्र या स्वयंरोजगाराला उद्योजकता म्हणून सादर करत असले तरी, हा प्रत्यक्षात तुटपुंजे उत्पादन (Petty Production)मध्ये अडकलेला श्रमिक वर्ग आहे, जो आपल्या श्रमाचे मूल्य बाजारपेठेच्या अनियंत्रित लहरींवर गमावत आहे.

उलट्या दिशेने झालेला संरचनात्मक बदल (Reverse structural Change) हा महाराष्ट्राच्या श्रमबाजारातील सर्वात चिंताजनक पैलू आहे. पारंपरिक अर्थशास्त्रानुसार, विकसित अर्थव्यवस्था कृषी व असंघटित क्षेत्रातून उद्योग व सेवाक्षेत्राकडे झुकतात, पण येथे चित्र उलटे दिसते. कौटुंबिक स्वयंरोजगार, लघु व्यवसाय, आणि अस्थिर मजुरीवर जगणाऱ्यांची संख्या वाढते आहे. पीएलएफएसच्या आकडेवारीनुसार, अनुसूचित जाती व जमाती समाजांतील रोजगाराचे स्वरूप कृषी व बांधकाम क्षेत्रात जास्त केंद्रित झाले आहे, तर उच्च सामाजिक गटांच्या तुलनेत त्यांना नियमित

वेतनाच्या नोकऱ्या अत्यल्प प्रमाणात मिळत आहेत. हा बदल अचानक झालेला नाही; तो नवउदारमतवादी धोरणांचा परिणाम आहे, जिथे कल्याणकारी राज्याने मागे हटून बाजाराच्या तत्त्वांवर श्रमबाजाराचे नियमन केले आहे. परिणामी, मोठ्या प्रमाणावर असंघटित क्षेत्रात श्रमिकांची भरती होते, जेथे किमान वेतन, सामाजिक सुरक्षा, आणि कंत्राटी सुरक्षेचा पूर्ण अभाव असतो.

याच वेळी, महिलांमध्येही स्वयंरोजगार वाढल्याचा भास होतो, पण पीएलएफएस डेटा दाखवतो की हा कुटुंबव्यवस्थेतील असमान श्रमवाटपाचा विस्तार आहे. घरगुती उद्योग, विनामूल्य कौटुंबिक व्यवसाय, आणि तात्पुरत्या स्वरूपाचे छोटे व्यवसाय हेच त्यांच्या रोजगाराचा मुख्य भाग आहेत. यामुळे महिलांचा रोजगार आकडेवारीत दिसतो, पण प्रत्यक्षात तो अनौपचारिक आणि अल्प उत्पन्नाचा असतो. अनुसूचित जातींमध्ये घरगुती रोजगारदाते (Household as Employer) या वर्गात मोठी वाढ झाली आहे, जी त्यांच्या वाढत्या अस्थिरतेचे सूचक आहे.

ही परिस्थिती अधिक गंभीर होते, जेव्हा आपण स्वयंरोजगार ही संकल्पना तपासून पाहतो. नवउदारमतवादी अर्थव्यवस्था या स्वयंरोजगाराच्या संकल्पनेला अर्थसंकल्पीय बचतीसाठी आणि सामाजिक सुरक्षेची जबाबदारी टाळण्यासाठी वापरते. मोठ्या उद्योगधंद्यांनी कंत्राटीकरणाच्या माध्यमातून रोजगार अस्थिर केल्यामुळे, अनेकांना स्वतःच लघु उद्योग सुरू करण्यावाचून पर्याय उरत नाही. पण हा उद्योजकतेचा नव्हे, तर उपासमार टाळण्यासाठी घेतलेला अंतिम निर्णय आहे. पीएलएफएस डेटावरून दिसते की, मुस्लिम समाजातही नियमित वेतनाच्या नोकऱ्या घसरल्या आहेत आणि स्वयंरोजगार वाढला आहे-पण तो किरकोळ विक्री, गाड्यांवरील व्यवसाय आणि अनौपचारिक सेवा उद्योगांपुरता मर्यादित आहे.

म्हणूनच बेरोजगारीचा दर घसरतोय, पण तो गुणवत्तापूर्ण रोजगाराच्या वाढीमुळे नव्हे, तर मजबुरीच्या स्वयंरोजगारामुळे. नवउदारमतवादी भारतात, आर्थिक व्यवस्थेतील सुरक्षिततेची जबाबदारी सरकारने नाकारली आहे आणि मजुरांना स्वतःच्या अस्थिरतेचे खापर स्वतःवरच फोडावे लागत आहे. परिणामी, पीएलएफएस आकडेवारीतील वाढलेला रोजगार हा प्रत्यक्षात श्रमिकवर्गासाठी वाढलेल्या संकटाचाच निदर्शक आहे.

**महाराष्ट्र आणि जागतिक भांडवल व्यवस्था :**

हा रोजगाराचा असुरक्षिततेकडे झुकणारा कल केवळ बाजारपेठेतील निसर्गसिद्ध प्रक्रिया नाही, तर तो भांडवलशाही उत्पादन व्यवस्थेच्या संरचनात्मक गरजांशी जोडलेला आहे. उत्पादनाच्या बदलत्या मूल्यसाखळ्या आणि जागतिक पुरवठा व्यवस्थांमध्ये भारतासारख्या देशांतून होणाऱ्या श्रमपुरवठ्याची रचना अशा पद्धतीने केली जाते, की वेतन खर्च कमी ठेवता येईल, श्रमशक्ती सहज बदलता येईल, आणि कामगारांना संघटित होण्याच्या संधी मिळणार नाहीत. औद्योगिक उत्पादनाच्या नव्या पद्धती - जसे की आऊटसोर्सिंग, कंत्राटीकरण, आणि कामाचे विभागणीकरण - या पद्धतींमुळे कामगारांमध्ये असलेला सामाजिक ऐक्यभाव कमी होत जातो आणि त्यांना विभाजित करून असंघटित आणि कमकुवत केले जाते.

शेतीतील संकट आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेतील अस्थिरता देखील शहरांकडे होणाऱ्या मजूर स्थलांतराच्या वेगाला वाढवते, पण यामुळे निर्माण होणाऱ्या अतिरिक्त श्रमशक्तीचा उपयोग शहरांमध्ये असलेल्या अनौपचारिक उद्योगसंस्थांसाठी अधिक स्वस्त आणि आज्ञाधारक कामगार पुरवण्यासाठी केला जातो. मोठ्या शहरांमध्ये स्थलांतर करणाऱ्या श्रमिकांची रोजगारसंधी मोठ्या प्रमाणावर अनिश्चिततेने भरलेली असते. महाराष्ट्रात शेतमालाच्या किंमतीत होणारी अस्थिरता आणि उत्पादन खर्चात होणारी वाढ यामुळे अनेक शेतकऱ्यांना शेती परवडत नाही आणि मजूर वर्गालाही कामाच्या संधी तुटपुंज्या राहतात. परिणामी, ग्रामीण भागातून शहरांकडे होणाऱ्या स्थलांतराचा वेग वाढतो, पण शहरांत निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधींचे स्वरूप अधिक अस्थिर आणि अनौपचारिक बनत चालले आहे.

शेतीतील संकट, औद्योगिक उत्पादनातील अनिश्चितता, आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदल यांमुळे कामगारसंघटनांची ताकद कमी होत आहे. औद्योगिक स्थळी संघटित होण्याऐवजी मजूर आता वेगवेगळ्या अनौपचारिक आणि स्वतंत्र स्वरूपाच्या रोजगारांमध्ये विखुरले गेले आहेत, ज्यामुळे त्यांना त्यांच्या वेतनाच्या बाबतीत वाटाघाटी करण्याची संधीच राहत नाही. शिवाय, अनेक औद्योगिक क्षेत्रांनी कायमस्वरूपी कामगारांचे प्रमाण घटवून कामगार व्यवस्थापनाचा भार कंत्राटीकरणाच्या प्रक्रियेद्वारे कमी केला

आहे. हा बदल केवळ नियोक्त्यांसाठी फायदेशीर नाही, तर राज्य आणि धोरणकर्त्यांसाठीही उपयुक्त ठरतो, कारण तो संघटित श्रमशक्तीच्या राजकीय ताकदीला नियंत्रित करण्याचे साधन बनतो.

याच प्रक्रियेचा एक परिणाम म्हणजे मजूर संघटनांचे विसर्जन आणि कामगारांच्या हक्कांविषयीची सामूहिक जाणीव नष्ट होणे. पूर्वी औद्योगिक क्षेत्रात श्रमिक चळवळीचे महत्त्व असले तरी, आज त्यांची संख्या आणि प्रभाव दोन्ही कमी झाले आहेत. परिणामी, कामगारांच्या हक्कांसाठी राजकीय दबाव कमी झाला आहे, आणि धोरणकर्त्यांवर उद्योगधंद्यांची मक्तेदारी वाढत चालली आहे. रोजगाराच्या या नव्या संरचनेत, मजूर हे केवळ आकडेवारीच्या खेळाचे साधन राहतात – बेरोजगारी कमी दिसावी म्हणून अस्थिर रोजगार वाढवला जातो, पण त्या रोजगाराच्या गुणवत्तेबद्दल कोणतीही चर्चा होत नाही.

ही संपूर्ण प्रक्रिया केवळ भारतापुरती मर्यादित नाही, तर ती जागतिक अर्थव्यवस्थेच्या नवउदारमतवादी चौकटीत समजून घ्यावी लागते. जागतिक स्तरावर श्रमशक्तीच्या मांडणीसाठी असलेल्या धोरणात्मक बदलांमध्ये भारतासारख्या देशांतील अनौपचारिक श्रम हा एक महत्त्वाचा स्रोत म्हणून पाहिला जातो. त्यामुळे रोजगाराच्या अस्थिरतेकडे केवळ अपघात किंवा विकासाच्या अपरिहार्यतेच्या दृष्टीने न पाहता, ती एक आर्थिक धोरणात्मक गरज म्हणून समजून घेतली पाहिजे.

या परिस्थितीत, बेरोजगारी दर ही एकमेव समस्या नाही. प्रश्न आहे, उपलब्ध रोजगाराचे स्वरूप काय आहे? तो रोजगार टिकाऊ आहे का? आणि तो श्रमिकांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दृष्टिकोनातून सक्षम करतो का? बेरोजगारी दर घटला असला तरी त्यासोबतच वेतनवाढ, सामाजिक सुरक्षितता, आणि रोजगाराच्या हक्कांविषयीची जाणीव यांचीही तपासणी करणे आवश्यक आहे. रोजगार आणि त्याच्या अस्थिरतेकडे पाहण्याचा हा भौतिकवादी दृष्टिकोन अधिक व्यापक समज देतो – जिथे आकडेवारीच्या पलीकडे पाहण्याची गरज आहे, आणि अर्थव्यवस्थेच्या उत्पादन आणि वितरण व्यवस्थेच्या संरचनेतील विसंगती समजून घेण्याची गरज आहे.

**जाताजाता**

या सर्व डेटाचा सारांश असा की, बेरोजगारी दराच्या आड महाराष्ट्रातील रोजगार व्यवस्था अधिकाधिक छिन्नविच्छिन्न होत आहे. अनुसूचित जाती–अनुसूचित जमाती, महिला, आणि अल्पसंख्यांक गटांना 'रोजगार' मिळाला तरी तो असुरक्षित, अनौपचारिक, आणि मानवी गरजांपेक्षा खालच्या दर्जाचा आहे. शासनाच्या धोरणांनी केवळ संख्यांवर नव्हे तर रोजगाराच्या गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. अन्यथा, 'रोजगार वाढी'चे आकडे केवळ कागदी घोडे ठरतील. त्यामुळे, बेरोजगारी दराच्या पलीकडे पाहून श्रमशक्तीच्या कार्यरत परिस्थितींचे आणि व्यापक सामाजिक–आर्थिक बदलांचे विश्लेषण करणे अत्यंत अत्यावश्यक बनले आहे.

**(लेखक किंग्स कॉलेज, लंडनमधील इंटरनॅशनल डेवलपमेंट आणि जियोग्राफी विभागात पी.एचडी. अभ्यासक आहेत. त्यांचे संशोधन मुख्यतः कामगार (श्रम), तंत्रज्ञान, आणि सार्वजनिक वित्त यांच्या अर्थराजकीय व्यवस्थेवर केंद्रित आहे. संपर्क: +९१ ९६५७७९९९८६, ईमेल:** hiteshdpotdar@gmail.com**)**